UGC Approved Sr. No. 49366

GLOBALLY INDEXED

IMPACT FACTOR SJIF 2016 6.177

SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2349-4766






An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

3

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

310 आदिवासी शिक्षण– दशा आणि दिशा
*मोरे रविंद्र गोरक्षनाथ (1395-1396)*

311 ग्रामीण विकासातील पंचायतराज संस्थांची भूमिका
*तुवर जालिंदर गोरक्षनाथ (1397-1398)*

312 अकोला जिल्हयातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन
*डॉ. कु. प्राजक्ता वि. पोहरे & डॉ. रामेश्वर मा. भीसे (1399-1410)*

313 जीएसटी कर प्रणालीची संरचना आणि परिणाम
*पाऊलबुध्दे अनुराधा रामभाऊ & प्रा. डॉ. अशोक कोरडे (1409-1411)*

314 कृषी विकास योजनांचा शेती क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा चिकीत्सक अभ्यास
*डॉ. राजेंद्र भोसले & गायकवाड ज्योती नानासाहेब (1412-1417)*

315 स्वचछता अभियानातंर्गत राबविण्यात येणा-या स्वच्छभारत अभियानाचा अभ्यास
*डॉ सुहास आव्हाड & दिगांबर ज्ञानदेव नलगे (1418-1420)*

316 आर्थिक सुधारणा काळातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा महाराष्ट्र राज्य सकल अंतर्गत उत्पादनावरील परिणाम
*प्रा. मदन शेळके (1421-1426)*

317 स्वंयसहाय्यता समुह बॅंक संलग्न कार्यकमांचा आढावा
*प्रा. संतोष एम. वाघमारे & डॉ. अजय पी. कुटे (1427-1430)*

318 भारतात परकीय भांडवलाची भूमिका
*प्रा. वैषाली योगराज भेले (1431-1435)*

319 सेंद्रिय शेती पदधती काळाची गरज
*कु. रुपाली जाधव (1436-1437)*

320 शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्त्या : 2011 ते 2017 (संदर्भ : नाशिक जिल्हा)
*प्रा. डॉ. अनिल डी. पवार (1438-1442)*

321 शाश्वत विकासासाठी सेंद्रीय शेतीचे महत्त्व : एक अभ्यास
*प्रा. एम.व्ही. हिरे (1443)*

322 वस्तु व सेवा कर – वाटचाल आणि प्रत्यक्ष आकारणी
*प्रा. डॉ. सुनील पं. उगले (1444-1449)*

323 मध्ययुगीन भारतातील उद्योग, व्यापार व त्याचा प्रभाव
*प्रा. तुळशीदास मोकल (1450-1453)*

324 जागतिकीकरणाचा कृषीमाल विपणन व्यवस्थेवरील परिणाम
*प्रा. डॉ. आर के जाधव (1454-1460)*

325 भारतातील विविध कृषी आधारित उदयोगांच्या समस्या आणि संधी
*श्री. गणेश तुकाराम टाव्हरे (1461-1475)*

*.व्ही. हिरे (1443)*

# त विकासासाठी सेंद्रीय शेतीचे महत्त्व : एक अभ्यास

एम.व्ही. हिरे
*. एस. जी. कॉलेज मालेगाव कॅम्प, जि. नाशिक – 423105.*

भारत कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य ाधारण महत्त्व आहे. देशातील 65 टक्के लोकसंख्या शेतीक्षेत्रावरच अवलंबून आहे. अशा या शेतीक्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी आज सेंद्रीय शेतीला प्राधान्य दिले जात आहे. त्यासाठी शासनस्तरावरुन नवनवीन योजना हाती घेतल्या जात आहेत. सेंद्रीय शेती महत्त्व पटवून दिले जात आहे.

- **सेंद्रीय शेतीची संकल्पना** : नैसर्गिक पध्दतीने अन्नद्रव्यांनी समृध्द केलेल्या जमिनीत जेव्हा पीके घेतली जातात तेव्हा त्यास सेंद्रीय शेती म्हटले जाते. यासाठी शेती उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा वापर न करता पालापाचोळा जमिनीत कुजवून ताग किंवा हिरवळीची पिके जमिनीत गाडून, शेणखत, कंपोस्ट खत किंवा गांडूळ खतांचा वापर करुन शेतीचे पुनर्भरण केले जाते.

- **सेंद्रीय शेतीची वैशिष्ट्ये :**

1) सेंद्रीय शेतीमुळे शाश्वत व चिरंतन शेतीचा विकास साध्य होतो.
2) सेंद्रीय शेतीमुळे जमिनीची दीर्घकालीन उत्पादकता व पोत यांचे नैसर्गिक पध्दतीने व्यवस्थापन करणे शक्य होते.
3) सेंद्रीय शेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन शेती फायदेशीर ठरते.

- **शोध निबंधाची उद्दिष्टे :**

1) शाश्वत विकासासाठी सेंद्रीय शेतीचे फायदे अभ्यासणे.
2) सेंद्रीय शेतीचे तत्वे जाणून घेणे.
3) भारतातील सेंद्रीय शेती खालील क्षेत्र अभ्यासणे.

भारत अन्नधान्य उत्पादनाबाबत स्वयंपूर्ण झाला असला तरी तो शाश्वत शेती व आरोग्याच्या दृष्टीने अशाश्वत व अस्थिर राहिला आहे म्हणून भारतात सन 1990 च्या दशकानंतर कृषी क्षेत्राचे रासायनिक शेतीपासून सेंद्रीय शेतीकडे स्थलांतरासाठी शासकीय, निमशासकीय व खासगी पातळीवरुन शिफारस करण्यात आली आहे. सन 2000 सालच्या राष्ट्रीय कृषी धोरणात सेंद्रीय शेतीचे महत्त्व अधोरेखीत केले आहे. सेंद्रीय शेती ही एक जीवनपध्दती आहे. केवळ पिकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी ही संकल्पना मर्यादित नाही. जसा आहार, तसा विचार असतो. सात्विक आहारामुळे मानवाचा कौटुंबिक, शारिरीक, मानसिक, नैतीक विकास होतो. त्यामुळे आजच्या आधुनिक व स्पर्धात्मक युगात सेंद्रीय शेतीविषयक असणाऱ्या गैरसमजूती दूर केल्या पाहिजेत. प्रमाणीकरणाच्या मानकांचे विश्लेषण शास्त्रीय व सोप्या भाषेत शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन दिले तर मानकांच्या बाबतीतील गैरसमज दूर होतील सेंद्रीय शेतीच्या विकासासाठी पीकनिहाय तंत्रज्ञान प्रायोगिक तत्वावर विकसित करणे, शेतकऱ्यांना सेंद्रीय शेती परिक्षणाची सोय, सेंद्रीय मालाला हमीभाव, सेंद्रीय शेतीमाल विक्रीसाठी सुनियंत्रित यंत्रणा निर्यातक्षम सेंद्रीय उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून सुजलाम सुफलाम कृषी भारताची पुन्हा एकदा नव्याने ओळख निर्माण होईल.